MHRG110010642025

**राहुल शिर्के वि. कोणीही नाही.**

## दिवाणी किरकोळ अर्ज १०५/२०२५ मध्ये नि. क्र. १ वरील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट खाली वारस दाखला मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यत म्हणणे असे की, अर्जदार क्र.१ व ३ चे वडील व अर्जदार क्र.२ चे पती रमेश नारायण शिर्के हे दिनांक २४.०९.२०२५ रोजी उपजिल्हा रूग्णालय माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे उपचारा दरम्यान मयत झाले आहेत. अर्जदार यांना अनुकंपातत्वावर महाराष्ट्र शासनामध्ये नोकरी मिळण्याकरिता ते मयत रमेश नारायण शिर्के यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार हे वारस असल्याने त्यांचे नावे वारस दाखला मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल करून मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत प्रकरणांत अर्जदार यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठर्थ निशाणी क्र.१२ वर अर्जदार क्र.३ यांचा तोंडी पुरावा दिला आहे. तसेच निशाणी क्र.२२ वर साक्षीदार क्र.२ दिक्षिता देवानंद वाघोस्कर यांचा पुरावा दिलेला आहे. निशाणी क्र.२३ वरील पुरशिसनुसार अर्जदार यांनी त्यांचा तोंडी पुरावा बंद केला.

४. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी आधारकार्ड, पॅनकार्ड व रेशनकार्ड यांच्या प्रमाणित प्रती दाखल केल्या आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी रमेश नारायण शिर्के हे

दिनांक २४.०९.२०२५ रोजी मयत झाल्याबाबत त्यांच्या मृत्यु दाखल्याची प्रमाणित प्रत निशाणी क्र.१३ कडे दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी महाराष्ट्र विधुत वितरण कंपनी मर्या. गोरेगांव यांचेकडील दिनांक ०३.११.२०२५ रोजीचे अनुकंपा तत्वावर नोकरी व मासिकनिर्वाहा भत्ता मिळणेचा अर्जाची प्रमाणीत प्रती  निशाणी क्र.१४ कडे दाखल केली आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी आधारकार्डच्या प्रमाणीत प्रती अनुक्रमे  निशाणी क्र.१५,१६ व १७ कडे दाखल केलेल्या आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी पॅनकार्डच्या प्रमाणीत प्रती अनुक्रमे निशाणी क्र.१८,१९ व २० कडे दाखल केलेल्या आहेत. अर्जदार यांनी रेशनकार्डची प्रमाणीत प्रत निशाणी क्र.२१ कडे दाखल केली आहे. अर्जदार यांनी दिनांक २१.०१.२०२६ रोजीच्या दैनिक सागर वृत्तपत्रामध्ये मयत रमेश नारायण शिर्के यांच्या मृत्यु बाबत नि.क्र.११ कडे नोटीस प्रसिध्द केली. सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चार महिन्याच्या कालावधीमध्ये न्यायालयात कोणीही हरकत उपस्थित केली नाही.

५. अर्जदाराच्या पुराव्यानुसार अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत रमेश नारायण शिर्के यांचे कायदेशीर वारस होय. त्यांच्या पुराव्यावरून व हिंदु वारसा कायद्यातील तरतुदी विचारात घेवून असे निदर्शनास येते की, मयत रमेश नारायण शिर्के यांचे वारस म्हणून अर्जदार क्र.१ राहुल रमेश शिर्के हा मुलगा, अर्जदार क्र.२ सविता रमेश शिर्के ही पत्नी व अर्जदार क्र.३ रसिका रमेश शिर्के ही मुलगी या नात्याने मयताचे वारसदार आहेत. सदर अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदाराचे कथन व तोंडी पुरावा कोणीही नाकारलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास अर्जदार पात्र आहेत. सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

:: **आदेश** ::

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत रमेश नारायण शिर्के यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जदार यांच्या नावे वारस दाखला देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी न्यायालयीन मुद्रांक भरल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.05.08 16:46:57 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः–०८.०५.२०२६. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.